# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### महाराष्ट्र मंजूर प्रादेशिक योजनांच्या क्षेत्रात बांधकाम परवानगीबाबत

**(१) २०९४ (१८-०३-२०२०) श्री.महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र मंजूर प्रादेशिक योजना यांच्या क्षेत्रात बांधकाम करायचे असल्यास जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेणे बंधनकारक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकामी पूर्ततेची बाब अतिशय किचकट व गुंतागुंतीची असल्याने ग्रामीण भागातील जनतेला त्रास सहन करावा लागत असल्याने ग्रामीण भागातील जनतेला एकाच ठिकाणी बांधकाम व शेती परवानगी सुलभपणे मिळावी, अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे मा.महसूल मंत्री यांच्याकडे लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०६-२०२२) :** (१) होय. हे खरे आहे.

शासनाने राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या प्रादेशिक योजना मंजूर केल्या आहेत. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मध्ये झालेल्या आणि दिनांक २२/०४/२०१५ पासून अंमलात आलेल्या सुधारणेनुसार कलम १८ मधील पोटनियम क्र.(१)(iii) मधील तरतुदीनुसार कोणत्याही नियोजन प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील किंवा गावठाण हद्दीबाहेरील क्षेत्रामधील जमिनींवर विकास परवानगी देण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांनी नेमून दिलेल्या अधिकाऱ्यास आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) ग्रामीण भागातील गावठाण हद्दीमध्ये बांधकाम परवानगीचे अधिकार संबंधित ग्रामपंचायतीस असून नियोजन प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील किंवा गावठाण हद्दीबाहेरील क्षेत्रामधील जमिनींवर बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांनी नेमून दिलेल्या अधिकाऱ्यास आहेत. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना या संदर्भात अधिनियम, १९६६ चे कलम १८ मध्ये तरतुद असल्याने त्यासाठी स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची आवश्यकता नाही.

(४) चौकशी करण्याचा किंवा कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) विलंब होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाड्यात सौर कृषी पंप योजनेंतर्गत ऑनलाईन प्रक्रिया सुरु ठेवण्याबाबत

**(२) २९२६ (२८-०५-२०२०) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक १४७ ला दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेंतर्गत राज्यात पंप लावण्याचे महावितरणचे नियोजन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना महावितरण मार्फत २४ तास वीज उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांच्या विहिरीत पाणी उपलब्ध असून सुध्दा त्यांना पिकास / फळबागास वेळेवर पाणी देता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील वर्षापर्यंत मराठवाड्यासाठी ४०००० एवढे उद्‌दिष्ट असून ४५००० शेतकऱ्यांनी सौर ऊर्जा पंपासाठी अर्ज भरले परंतु नंतर मराठवाड्यातील ऑनलाईन पोर्टल बंद केले असल्याने शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज करता आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, सन २०२०-२०२१ मध्ये मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी अजून ५०००० एवढे उद्‌दिष्ट देण्यात यावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२८-०६-२०२२) :** (१) शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे या उद्‌दिष्टानुसार राज्यातील शेतकऱ्यांना कृषी वापरासाठी पारेषण विरहीत सौर कृषी पंप देण्यासाठी "मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेची" अंमलबजावणी महावितरण कंपनीव्दारे करण्यात येत आहे.

(२) पाण्याचे योग्य नियोजन होण्यासाठी तसेच कृषीपंपासाठी आवश्यक असलेला विद्‌युत पुरवठा लक्षात घेऊन मा.महाराष्ट्र विद्‌युत नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना महावितरणकडून रात्रीच्या वेळेत १० तास किंवा दिवसा ८ तास विजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे.

(३) मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेतील एक लक्ष सौर कृषी पंपापैकी मराठवाड्यातील अर्जदारांकरीता ४०००० एवढे उद्‌दिष्ट निश्चित करण्यात आले असून त्या अनुषंगाने ४६१७८ अर्ज मंजूर करण्यात आलेले आहेत.

(४) राज्यातील कृषीपंप धारकांना वीज जोडणी देण्याकरीता ऊर्जा विभागाच्या दिनांक १८/१२/२०२० च्या शासन निर्णयानुसार धोरण जाहीर करण्यात आले आहे. त्यातील तरतुदीनुसार शेतकऱ्यांना कृषीपंप जोडणीकरीता अर्ज करता येऊ शकतील.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

# हुंबरट-साकेडी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) ग्रामीण मार्ग २७६ वर असलेल्या नाल्यावर पुल बांधण्याबाबत

**(३) २९३६ (२९-०५-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हुंबरट-साकेडी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) ग्रामीण मार्ग २७६ वर हायवेपासून २०० मीटर अंतरावर असलेल्या नाल्यावरील कमी उंचीच्या मोरीवर पावसाळयात पाणी येत असल्याने साकेडीसह करंजे, नागवे, हरकुळ, कोंडये आदी भागातील मार्ग काही काळ बंद होत असल्यामुळे ग्रामस्थांना रस्त्यावरून जाताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने या ठिकाणी मोठा पूल बांधण्याची मागणी दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० रोजी तसेच गत २ वर्षापासून सातत्याने साकेडी सरपंच तसेच ग्रामस्थांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, अधीक्षक अभियंता रत्नागिरी, सार्वजनिक बांधकाम मंडळ व कार्यकारी अभियंता, सा.बां विभाग, कणकवली आदीकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१०-०६-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रश्नांकित हुंबरट साकेडी रस्ता ग्रा.मा.२७६ असून सदर रस्त्यावर कि.मी. ०/२०० मध्ये कॉजवे आहे. सदर पूलाचे सर्व्हेक्षण करण्यात आले असून त्याठिकाणी २४ मीटर लांबीच्या दुहेरी उंचपातळीच्या पूलाचे बांधकाम करावे लागणार आहे. सदर पूल ग्रामीण मार्गावरील असून, पूलाचे काम निधी, निकष व प्राधान्यक्रमाच्या अधिन राहून हाती घेण्यात येईल. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कायद्यातील त्रुटींचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमल्याबाबत

**(४) ३०४० (३१-०५-२०२०) श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १११० ला दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कायद्यातील त्रुटींचा अभ्यास करून त्यानुसार शासनास अहवाल सादर करण्यासाठी श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने समितीची नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे काय, समितीने अहवालात नमूद केलेल्या शिफारसीचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, समितीने सादर केलेल्या शिफारसींनुसार महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील त्रुटी दूर करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२९-०६-२०२२) :** (१) होय.

(२) व (३) सावकारी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कायद्यातील त्रुटींचा अभ्यास करून त्यानुसार शासनास अहवाल सादर करण्यासाठी श्रीमती विद्या चव्हाण, माजी वि.प.स. यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत केली असून समितीचा अहवाल शासनास प्राप्त होताच पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भात वर्धा-यवतमाळ जिल्हयात कापूस खरेदी केंद्रात (सीसीआय) शेतकऱ्यांचे कापूस खरेदी करतांना लुट होत असल्याबाबत

**(५) ४०८६ (१७-०७-२०२०) श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भात वर्धा-यवतमाळ जिल्हयात कापूस खरेदी केंद्रात (सीसीआय) शेतकऱ्यांचे कापूस खरेदी करतांना ग्रेडर्स आणि जिनिंग प्रोसिंग मालक व व्यापाऱ्यांच्या संगनमताने शेतकऱ्यांची कापसाची तीन किलोची घट दाखवून मार्जिन ठेवून मोठ्या प्रमाणात लुट सुरु असल्याचे दिनांक ६ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांची लुट करणाऱ्या संबंधित दोषींविरोधात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२९-०६-२०२२) :** (१) नाही, हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाने दिनांक २७ सप्टेंबर, २०१९ रोजी किमान आधारभूत दराने (रुपये ५३५० ते रुपये ५५५० प्रति क्विंटल) कापूस खरेदी साठी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीकडे नोंदणी केलेल्या व त्यांना टोकन दिलेल्या दिवशी शेतकऱ्याकडून FAQ दर्जाच्या कापसाला ८ ते १२ टक्के आद्रतेच्या प्रमाणात किमान हमी दराने कापूस खरेदी करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कापसाचे वजन करणे, वजन पट्टी देणे व वजन बाबतचे इतर सर्व कामकाज संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीने नेमलेल्यामापाऱ्या मार्फत केले जाते. जिनिंग प्रेसिंग मालकासोबत सीसीआय चे झालेल्या करारानुसार कापसावर प्रक्रिया केली जाते. हे सर्व कामकाज केंद्र शासनाच्या मुख्य अभिकर्ता व त्यांचे उप अभिकर्ता म्हणून कापूस पणन महासंघ द्वारे नियंत्रित करुन कापसाची खरेदी चालू आहे.

(२) हंगाम २०१९-२० मध्ये कापसाला केंद्र शासनाद्वारे जाहीर केल्या जाणाऱ्या किमान दाराने राज्यामध्ये केंद्र शासनाच्या मुख्य अभिकर्ता भारतीय कपास निगम लिमिटेड (सीसीआय) यांच्याद्वारे एकूण ९०, कापूस खरेदी केंद्रावर २३७ जिनिंग फॅक्टरी मध्ये तसेच त्यांचे उप अभीकर्ता म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ द्वारे सद्य:स्थितीत ८९ खरेदी केंद्रावर १७६ जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीमध्ये कापसाची खरेदी करण्यात येत आहे. दिनांक २५ जुलै २०२० अखेर सीसीआय द्वारे एकूण ५,३०,८७९ शेतकऱ्यांकडून १२७.८२ लाख क्विंटल तर कापूस पणन महासंघ द्वारे एकूण ३,३५,८०७ शेतकऱ्यांकडून एकूण ९१.८८ लाख क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे. covid-१९ आजाराच्या संक्रमणामुळे राज्यात दिनांक २४ मार्च, २०२० रोजी केलेल्या टाळेबंदीच्या सुरुवातीस हमी दराने सुरु असलेली कापूस खरेदी केंद्र पूर्णतः बंद ठेवावी लागल्याने शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करता आला नाही. परंतु केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने लॉकडाऊनच्या कालावधीत शेतमालाची हमी भावाने खरेदी करण्यास परवानगी दिल्यानंतर कापसाची पुन्हा खरेदी सुरु आहे.

सीसीआयने दिनांक ३०/०९/२०२० पर्यंत शेतकऱ्यांकडील FAQ दर्जाचा कापूस खरेदी करण्याचे घोषित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात चटईक्षेत्रफळाचे सर्वाधिकार उपमुख्य अभियंता यांचे प्रदान करण्यात आल्याबाबत

**(६) ४२०१ (१६-०७-२०२०) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील सुमारे ४०० ते ५०० कोटी किंमतीच्या चटई क्षेत्रफळाच्या वितरणाचे सर्वाधिकार उपमुख्य अभियंता रामा मिटकर यांच्या समितीला प्रदान करण्याचा निर्णय अलिकडेच मा.गृहनिर्माण मंत्री यांनी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चटईक्षेत्रफळ वितरणासोबत शिथिलता देण्याचे अधिकारही या समितीला देऊन थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या अधिकारालाच आव्हान देण्यात आले आहे तसेच म्हाडा उपाध्यक्षांकडे असलेले अंतिम अधिकार उपमुख्य अभियंत्याकडे सुपूर्द करण्यात आल्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात समांतर यंत्रणा उभी राहणार आहे काय,
(३) असल्यास, झोपडीवासीयांना ३१ चौरस फुटाचा लाभ मिळणार असल्याचे दाखविण्यात आले असले तरी, फंजीवल चटईक्षेत्रफळ व इतर शिथीलता लक्षात घेता विकासकांना ४०० ते ५०० कोटीचे चटई क्षेत्रफळ मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०२-०३-२०२२) :** (१) व (२) विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ मधील तरतुदीनुसार ३०० चौ.फूट एवढ्या वाढीव आकारमानाच्या पुनर्वसन सदनिका पात्र लाभार्थ्यांना देण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात नियमानुसारच स्वतंत्र कक्षाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

म्हाडा उपाध्यक्षांकडे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अधिकार नाहीत.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील छावण्यांची ५% व २०% अशी देयके चौकशीच्या नावाखाली प्रलंबित असल्याबाबत

**(७) ४२८६ (१४-०९-२०२०) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात सन २०१९ मध्ये पडलेल्या भयावह दुष्काळामध्ये शासन निर्णयाव्दारे जिल्हयातील विविध संस्थांना जनावरांच्या छावण्या सुरु करण्यासाठी परवानगी देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील छावण्या सुरू असताना शासनाने महसूल यंत्रणेमार्फत चारा, पशुखाद्य, पाणी वाटपाचे दैनंदिन अहवाल घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्व जिल्हयांतील छावण्यांची संपूर्ण देयके अदा केलेली असतानाही बीड जिल्हयातील ५% व २०% अशी देयके चौकशीच्या नावाखाली प्रलंबित ठेवलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त प्रलंबित देयके छावणी चालकांना अदा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२९-०६-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) हे खरे नाही.

राज्यातील सर्व जिल्हयातील चारा छावण्यांची देयके अदा झालेली असून, चौकशीच्या नावाखाली चारा छावण्यांची देयके प्रलंबित ठेवण्यात आलेली नाहीत. तथापि, बीड जिल्हयातील चारा छावण्यांचे लेखापरिक्षण करणेकरीता २०% अनुदान राखीव ठेवण्यात आले आहे. बीड जिल्हयातील चारा छावणी संस्थेने लेखापरिक्षण पूर्ण न केल्यामूळे सन २०१९-२०२० मध्ये ३६.४० कोटी रुपये निधी समर्पीत करण्यात आला. लेखापरिक्षणाकरीता राखीव ठेवण्यात आलेल्या अनुदानापैकी १७.६६ कोटी रुपयांची मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्या मागणीनुसार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र क्र. जा.क्र.२०२०/महसूल/नै.आ/पाट/सीआर-१३, दिनांक २२/०५/२०२० अन्वये शासनास प्राप्त झालेली आहे. याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

---

## समुद्र लाटांपासून वीज निर्मिती करण्याबाबत

**(८) ४९९८ (१४-१२-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात समुद्र लाटांपासून वीज निर्मिती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, या प्रस्तावाबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२९-०६-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरातील अनेक शासकीय व खाजगी रूग्णालयांकडून रूग्णांकडे प्लाझ्माची मागणी करण्यात येत असल्याबाबत

**(९) ८४७० (१०-०६-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना रूग्णांच्या उपचारात प्लाझ्मा थेरेपी उपयुक्त नसल्याचा निर्वाळा देण्यात आला असून नागपूर शहरातील अनेक शासकीय व खाजगी रूग्णालयांकडून रूग्णांकडे प्लाझ्माची मागणी करण्यात येत असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या निर्देशानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय आणि महापालिकेच्या रूग्णालयामध्ये प्लाझ्मा थेरेपी बंद करण्यात आली असतानाही कोरोना रूग्णांवर उपचार करणारे डॉक्टर रूग्णांना प्लाझ्मा आणण्यासाठी सांगत असल्याच्या अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या आरोग्यसेवांतर्गत (Central Drugs Standard Control Organization) कैंद्रिय औषधी मानक नियंत्रण संगठन यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्लाझ्माच्या १ बॅगची किंमत रुपये ५५००/- ठरविण्यात आली असून त्या बॅगसाठी रक्त पेढयांकडून रुपये १० ते १५ हजाराची मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२७-०६-२०२२) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) या संदर्भातील तक्रार रुग्णालय प्रशासनाकडे प्राप्त नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद (जि.औरंगाबाद) तालुक्यात अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन सुरु असल्याबाबत

**(१०) ८६४७ (१४-०६-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद (जि.औरंगाबाद) तालुक्यात डीएमआयसी परिसरातील लाडगांव व करमाड शिवारात लाखो ब्रास गौण खनिजाचे अवैधपणे उत्खनन सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैध खनिज उत्खननामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करुन गौण खनिज उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२१-०६-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेतील त्रुटींबाबत

**(११) ८७१२ (०९-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेत शेतकऱ्यांची अडवणुक, निकृष्ट दर्जाचे बसविलेले सौर कृषी पंप तसेच सबसिडीसाठी राबविण्यात येणारी योजना व इतर सर्व बाबींची वरिष्ठस्तरावरून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी परभणी येथील लोकप्रतिनिधींनी सन २०२१ मध्ये मा.ऊर्जा मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यात बसविण्यात आलेले सौर कृषी पंप, बंद पडलेले सौर कृषी पंप यांची आकडेवारी फक्त कागदोपत्रीच दाखविण्यात आली असून, सदर अर्ज निकाली काढण्यात होत असलेल्या दिरंगाईची मुख्य अभियंता यांच्यास्तरावरून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषी कंत्राटदार, अधिकारी व यंत्रणा यांच्याविरूध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२९-०६-२०२२) :** (१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, विधान परिषद सदस्य यांनी मा.मंत्री (ऊर्जा) महोदयांना लिहिलेले दिनांक ०१/०२/२०२१ रोजीचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(२) "मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना" टप्पा-१ व टप्पा-२ व ३ अंतर्गत योजनेच्या निकषानुसार परभणी जिल्ह्यात एकूण ६६०८ अर्ज पात्र ठरले आहेत. त्यापैकी, सौर कृषी पंप आस्थापित करण्यासाठी पात्र ठरलेल्या ५०७१ लाभार्थी शेतकऱ्यांपैकी ४७८३ सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

अपात्र ठरविण्यात आलेल्या शेतकऱ्यांना अर्जातील त्रुटी दूर करण्याबाबत कळविण्यात आले होते. परभणी जिल्ह्यातील एकूण ७१० शेतकऱ्यांनी नवीन कागदपत्रे अपलोड केली होती. त्यापैकी ४९२ अर्ज मंजूर करण्यात येऊन ३९० सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले आहेत.

परभणी जिल्ह्यात मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेंतर्गत एकूण १६५ तक्रार अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी १४७ म्हणजेच ८९% तक्रार अर्जातील तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.

मुख्य अभियंता (नांदेड) व अधीक्षक अभियंता (परभणी) यांच्याद्वारे कंत्राटदारासोबत आढावा बैठक घेऊन पुरवठा करण्यात आलेल्या सौर कृषी पंपात बिघाड झाल्यास तो ताबडतोब दुरुस्त करण्याबाबत महावितरणकडून सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे सौर कृषी पंप आस्थापित करण्यास विलंब होत असल्यास शेतकऱ्यांना निवड केलेल्या पुरवठादाराऐवजी दुसरा पुरवठादार निवड करण्याचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आर्णी, दारव्हा, नेर व पुसद (जि.यवतमाळ) शहर व तालुक्यातील वाळू चोरी रोखण्याबाबत

**(१२) ८७७२ (२१-०६-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ६९१३ ला दिनांक २ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी, दारव्हा, नेर व पुसद (जि.यवतमाळ) शहर व तालुक्यातील अनेक ठिकाणी अवैधरित्या हजारो ब्रास वाळू चोरी होत असल्याचे माहे मे, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाळूचोरीकडे महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने शासनाचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यवतमाळ जिल्ह्यातील वाळू चोरी करणाऱ्या वाळू माफिया व त्यांना सहकार्य करणाऱ्या महसूल प्रशासनातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन वाळू चोरी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२९-०६-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यातील अवैध रेती उपसा रोखण्याबाबत

**(१३) ९१३० (१४-०६-२०२१) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक ६७१५ ला दिनांक २ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) नांदेड जिल्ह्यातील उमरी बाजार परिसरात रामपूर पाथरी, भामपूर, खंबाळा, पाडी या गावानजिक पैनगंगा नदी घाटावरुन अवैधरित्या बेसुमार रेती चोरी होत असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रेती घाटाचा मागील अनेक वर्षापासून लिलाव झालेला नसल्याने रेतीमाफिया याचा फायदा घेऊन सर्रास अवैधरित्या रेती उपसा करीत असल्याने शासनाचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैधरित्या रेती उत्खनन करणाऱ्या रेतीमाफिया व त्यांना सहकार्य करणाऱ्या महसूल अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन नांदेड जिल्ह्यातील वाळू चोरी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२९-०६-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## किरडूवे वायंगणी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) गावातील क्रशर बंद करण्याबाबत

**(१४) ९४०९ (१५-०७-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किरडूवे वायंगणी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) गावानजिक क्रशर सुरु असून येथे सुरुंग लावण्यात येत असल्यामुळे या भागातील विहिरींमधील पाण्याच्या पातळीत घट होऊन प्रदूषणात वाढ झाल्याने सदरहू क्रशर बंद करण्याची मागणी नागरिकांनी शासनाकडे केल्याचे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२९-०६-२०२२) :** (१) व (२) याबाबत सरपंच वायंगणे यांनी दिनांक १३/०१/२०२० रोजी तहसिलदार, संगमेश्वर यांचे कार्यालयात तक्रार दाखल केली.

त्याअनुषंगाने चौकशी केली असता, मौजे किरडुवे ता.संगमेश्वर येथील दगड खाणीमुळे पाण्याची पातळी कमी होत असल्याची व प्रदुषणात वाढ झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरण (जि.रायगड) येथील द्रोणागिरी डोंगराच्या पायथ्याशी माती उत्खनन रोखण्याबाबत

**(१५) ९८५१ (१५-०७-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथील द्रोणागिरी डोंगराच्या पाहणीनंतर पायथ्याशी भविष्यात उत्खनन होणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना व आदेश तत्कालीन जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिले असूनही सदरहू सूचनांचे उल्लंघन करुन डोंगराच्या पायथ्याशी माती उत्खनन सुरु असल्याचे माहे मे, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे हा काय,

(२) असल्यास, थोड्याशा मिळणाऱ्या रॉयल्टीपोटी शासनाने डोंगराच्या पायथ्याशी उत्खनन करण्यास परवानगी दिली असून सदर ठिकाणी माती उत्खननामुळे डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या हजारो नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यावरणाचा समतोल बिघडत असतानाही द्रोणागिरी डोंगराच्या उत्खननास परवानगी देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२९-०६-२०२२) :** (१) व (२) उरण येथील द्रोणागिरी डोंगराच्या पायथ्याशी भविष्यात उत्खनन होणार नाही अशा लेखी सूचना व आदेश तत्कालीन जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिलेले नाहीत. तथापि, मौजे चाणजे व म्हातवली येथे दगड/माती/मुरूम यांच्या उत्खननाचे परवाने उपविभागीय अधिकारी, उरण यांचेकडून देण्यात आलेले आहेत, आणि या उत्खननामुळे डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील अल्पसंख्यांक उर्दु शाळांमधील शिक्षकांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत

**(१६) १०५१६ (०६-०१-२०२२) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात अल्पसंख्यांक उर्दु शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याने शिक्षणा अभावी अल्पसंख्यांक मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्हा व वसई तालुक्यातील अल्पसंख्यांक उर्दु शाळांमध्ये मुख्याध्यापक व कायमस्वरुपी नविन शिक्षक मिळण्याबाबत स्थानिक माजी नगरसेवक व शिक्षण सभापती यांनी संबंधित जिल्हा प्रशासनामध्ये मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालघर जिल्ह्यातील उर्दु शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२९-०६-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे

(२) होय.

(३) जिल्हा परिषद सेस फंड अंतर्गत सन २०१९-२० मध्ये १६ शिक्षकांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत. तसेच पवित्र प्रणालीच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या ९ उमेदवारांना उर्दू शाळांमध्ये पदस्थापना देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय रूग्णालयातील अधिक्षकांना बसण्याकरीता सुव्यवस्थित जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१७) १०५४३ (०६-०१-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय रूग्णालय, नागपूर येथील अधीक्षक यांना रुग्णालयात बसण्याकरीता सुव्यवस्थित जागा नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रूग्णालयातील रुग्णांची योग्य ती काळजी घेणे तसेच, प्रशासकीय व रुग्णालय व्यवस्थेवर देखरेख ठेवणे इत्यादी अतिमहत्वाचे कार्यभार अधीक्षक यांचेकडे असताना उपरोक्त अधीक्षकांना बसण्याकरीता व त्यांचे कर्तव्य पार पाडण्याकरीता शासनाकडून जागा उपलब्ध करुन देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समाजातील दानशूर व विविध सामाजिक संस्थांसोबत समन्वय प्रस्थापित करून रूग्ण वा रूग्णालयास मदत मिळविणे या विभागाचे मुख्य काम असताना नागपूरच्या शासकीय वैद्यकीय रूग्णालयाकडून याची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२९-०६-२०२२) :** (१), (२) व (३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे वैद्यकीय अधिक्षकांच्या दालनाचे रंगरंगोटी व इतर किरकोळ कामे सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे सुरु असल्यामुळे वैद्यकीय अधिक्षकांना संस्थेत उपलब्ध असलेल्या एपीआयबी हॉल कार्यालयीन कामकाजासाठी उपलब्ध करुन देण्यात आला होता.

सदर हॉलमधून कार्यालयीन कामकाज सुरळीत सुरु होते. वैद्यकीय अधिक्षकांच्या दालनाचे काम माहे नोव्हेंबर, २०२१ ला पूर्ण झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्राध्यापकांचे विविध प्रश्न सोडविण्याबाबत

**(१८) १२२८४ (३०-०३-२०२२) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांबाबत मराठवाडा शिक्षक लोकप्रतिनिधी व प्राध्यापक संघटना प्रतिनिधी यांच्यासोबत मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांसह माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान बैठक घेतली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत मा.मंत्री महोदयांनी प्रश्न निकाली काढण्यासाठी संबंधित सचिवांना दिलेल्या निर्देशानुसार शासनाने कोणकोणते निर्णय घेतले आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्राध्यापकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२८-०६-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) अकृषी विद्यापीठे व संलग्नित अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नासंदर्भात लोकप्रतिनिधी व विविध संघटना यांच्याकडून प्राप्त निवेदने विचारात घेऊन सदर प्रलंबित प्रश्नाच्या संदर्भात शासनास शिफारस करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२१ अन्वये संचालक, उच्च शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहाराच्या व उपनगराचा विकास होत असतानाचा पुनर्विकासांच्या प्रक्रियेत सर्वसामान्य नागरिकांची बिल्डरकडून मोठ्या प्रमाणात होत असलेली फसवणूक

**(१९) ३३८३१ (०८-०१-२०१३) श्री.अशोक जगताप :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराच्या व उपनगराचा विकास होत असतानाच पुनर्विकासाच्या प्रक्रियेत सर्वसामान्य नागरिकांची बिल्डरकडून मोठ्या प्रमाणात फसवणूक केली जात असल्याप्रकरणी जनजागृती मंचचे अध्यक्ष मोठी जनजागृती अभियान सुरु केली असल्याचे माहे जुलै, २०१२ रोजी वा त्यादरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वसाधारण नागरिकांची बिल्डरकडून फसवणूक होवू नये याबाबत जनजागृती मंच कोणती उपाययोजना करणार आहे वा करीत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड (२४-०६-२०२२) :** (१) अशी बाब विभागाच्या अभिलेखात प्रथम दर्शनी निदर्शनास आली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय व अनुसंधान केंद्र, उत्तर नागपूर येथील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२०) ४७४०६ (०५-०७-२०१९) श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय व अनुसंधान केंद्र, उत्तर नागपूर येथे शासनाकडून कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मशिनरी, इमारत व कर्मचारी पगार याकरीता किती खर्च करण्यात आला आहे,

(३) असल्यास, रुग्णालयात आवश्यक डॉक्टर व कर्मचारी वृंद यांची पदभरती न केल्यामुळे रुग्णसेवकांवर कामाचा अतिरिक्त ताण येत असून रुग्णाची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पदभरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२९-०६-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर संस्थेस यंत्रसामुग्रीसाठी रुपये १,३३,६७,३९०/-, बांधकामासाठी रुपये ३,३७,८९,४१५/- व कर्मचारी पगार याकरीता रुपये १२,९६,२३,२३०/- इतका खर्च करण्यात आला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) वर्ग-१ व वर्ग-२ संवर्गातील सरळसेवेची रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोग व पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे शासनामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर संस्थेत वर्ग-३ तांत्रिक, अतांत्रिक व परिचर्या संवर्गाची काही पदे भरण्यात आलेली असून उर्वरीत पदे संचालनालयामार्फत स्पर्धापरीक्षेव्दारे तसेच पदोन्नतीने भरण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** 
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.